
जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in


६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

☎ : ०२० - २४२१५५८३, मो. : ८२६२०५६४८०

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया

: सौ. सुनंदा एस. चोरडिया



❖ वर्ष ५२ वे ❖ अंक २ रा ❖ ऑक्टोबर २०२० ❖ वीर संवत २५४६ ❖ विक्रम संवत २०७६


या अंकात


| | पान नं. |
|---|---|
| ● गुरु आनंद तीर्थ, चिचोंडी निर्माणाधीन एक भव्य तीर्थ | १५ ते २२ |
| ● दीपावली पूजन विधी | २३ |
| ● दीपावली पूजनाचे मुहुर्त | २७ |
| ● कोरोना से घबराएँ ना | २९ |
| ● कव्हर तपशील | ३३ |
| ● अंतिम महागाथा : २२ : महावीर की यात्रा | ३५ |
| ● किसी के दुख को मत बढाओं | ४० |
| ● सफल होना है तो : अच्छी सेहत के १७ सूत्र | ४१ |
| ● अदत्तादान | ४३ |
| ● रत्नसंदेश | ४६ |
| ● परिवर्तन | ४७ |
| ● हास्य जागृति | ४९ |
| ● सुखी जीवन की चाबियाँ - गुणानुराग | ५५ |
| ● धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहा | ६४ |
| ● आनन्द वचनामृत | ६५ |
| ● ऐसी हुई जब गुरुकृपा कीर्ति री चाह ना राख | ६९ |
| ● त्रैगुण्य विचार | ७१ |
| ● मात्र सोच नहीं, अवस्था भी बदलें | ७३ |
| ● जीवन बोध - आशावादी बनों | ७५ |
| ● लेने के साथ देना भी है | ७६ |
| ● महानता के बीज | ७६ |
| ● अल्पसंख्याक छात्रवृत्ती योजना | ७७ |
| ● आचार्य श्री शिवमुनिजी म.सा. - विश्व शांती पुरस्कार | ७९ |
| ● गुरु आनंद कोविड सेंटर, अहमदनगर | ८० |
| ● जय जिनेंद्र प्रतिष्ठान, पुणे - कोविड आयसोलेशन सेंटर | ८१ |

● सुर्यदत्ता ग्रुप, पुणे ८२
● नगरसेवक श्री. प्रवीणजी चोरबेले ८३
● सौ. किमया बोरा, इंदापूर – सन्मान ८४
● श्री. नवीनभाई शहा, पुणे – अमृत महोत्सव ८५
● वर्धमान एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयुट, पुणे ८७
● भयमुक्ति – अभय ८९
● लक्ष्य संस्थेला – खेल प्रोत्साहन पुरस्कार ९१
● शांती–क्षमा–प्रेम भवन, बालाजी देडगांव ९२
● स्तवन स्पर्धा – वडगांव मावळ ९२
● डॉ. दिलीप धींग – पुस्तक प्रकाशन ९३
● श्री. मोहनलाल संचेती, थेरगांव – पुरस्कार ९३
● विविध धार्मिक, सामाजिक व राजकीय बातम्या



जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |
|---|---|---|---|---|---|

या अंकाची किंमत ५० रुपये.

● www.jainjagruti.in
● www.facebook.com/jainjagrutimagazine


## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

● वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.

● आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. ● 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

जैन जागृति वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**BANK ACCOUNT DETAILS - A/C Name : JAIN JAGRUTI**

**Bank : STATE BANK OF INDIA** **Branch : Market Yard, Pune 37.**

**Current A/c No. : 10521020146** **IFS Code : SBIN0006117**


'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२–१३, पर्वती टॉवर्स, पुणे – ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड, पुणे – ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक – एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia



टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

टिप : जैन जागृति अंकात प्रकाशित लेख, बातम्या, जाहिरातीचे सर्वाधिकार सुरक्षीत आहेत.

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३, ऑफिस - मो. ८२६२०५६४८० **मो. संजय:९८२२०८६९९७ सुनंदा:९४२३५६२९९१**
**Email : jainjagruti1969@gmail.com ● Press Email : prakash.offset@rediffmail.com**


## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

❖ **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड - फोन : २७११९९४९, मो. ९९२१९१९४०९, ९४२२८३२८४९
❖ **पुणे शहर ❖ जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५
❖ **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८
❖ **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५ / ९३७३६८२१३७
❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७
❖ **सदाशिव पेठ परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०
❖ **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६
❖ **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१
❖ **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६
❖ **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६ / ७२७२९७२९९९
❖ **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे - ९८९०७२३४०२
❖ **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत- मो. ९४२०६३९२३०
❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी - मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०
❖ **बीड –** श्री. महावीर पन्नालालजी लोढा, मो. ९४२०५५६३२५
❖ **ता. सोनई, नेवासा, पाथर्डी –** श्री. मदनलालजी सी. भळगट - मो. ९४०४२३१६११, ९८८१४१४२१७
❖ **कुर्डुवाडी, बार्शी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१
❖ **मुंबई** खारघर- श्री. मदनलालजी गांधी-मो. ९८२०५३६७९३
❖ **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३-२३११००८,मो.९४२३९३९९९०
❖ **श्रीरामपूर –**श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७
❖ **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२-२२३८०७ मो.:९३२५००४९५०
❖ **अमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७
❖ **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६
❖ **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६
❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८
❖ **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८
❖ **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१-२६९५४३३
❖ **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. - ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

# गुरु आनंद तीर्थ

## आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या जन्म गावी चिचोंडीत साकारतेय एक भव्य श्रध्दा तीर्थ, मानवसेवा तीर्थ.

लेखिका – साईमिलन, पुणे




भारत ही संतांची भूमी आहे आणि या सर्व संतांनी आणि गुरूपरंपरांनी ही भूमि सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक दृष्टीने समृद्ध बनलेली आहे. या परंपरेने प्रत्येक वेळी एक नवा इतिहास घडवला आहे. जैन संस्कृती तर याला अपवाद ठरूच शकत नाही, तर जैन संस्कृतीने आपली एक वेगळी आदर्श अशी ऐतिहासिक परंपरा निर्माण केली आहे. जैन आचार्य, मुनीश्रेष्ठींचे यातील योगदान हे अतुलनीय असेच आहे. या देदीप्यमान परंपरेत आचार्य श्री आनंदऋषिजी यांचे अधिष्ठान हे जैनधर्मीयांच्या ओंजळीत आदर्श वसा

देऊन गेले आहे. हा गुरूपरंपरेचा वसा जोपासणे आणि वृद्धिंगत करून पुढच्या पिढीकडे देणे ही आपली जबाबदारी आहे, हे ओळखूनच उपाध्याय प्रवीणऋषिजी म. सा. यांनी अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी या श्री आनंदऋषिजी म. सा. यांच्या जन्मगावी 'गुरू आनंद तीर्थ' या भव्य प्रकल्पाच्या निर्मितीचा संकल्प केला आणि त्याला आता मूर्त स्वरूप येत आहे.

**चिचोंडी – पावनभूमी**

अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी हे परमश्रध्देय आचार्य भगवंत आनंदऋषिजी म. सा. यांचे जन्मस्थान. हे केवळ आनंदऋषिजींचे जन्मस्थान आहे आणि म्हणून इथे हे तीर्थ स्थापन होते आहे, असे नाही. तर या ठिकाणचे एक वैशिष्ट्य आहे. या गावातील जवळजवळ ९० टक्के समाज बांधव हे आचार्य आनंदऋषिजी म. सा. यांचे अनुयायी–भक्त आहेत. जैन बांधवां बरोबरच जैनेतर बांधवही गुरूंना वंदन केल्या शिवाय अन्न–पाणीही ग्रहण करीत नाहीत. हे गाव फार मोठे नाही. सुमारे ५–६ हजार लोकसंख्या असलेले हे गाव. पण या गावातील प्रत्येक व्यक्तीचा दिवस हा आनंद ऋषिजींच्या दर्शनानेच सुरू होतो. गावातील प्रत्येक दुकानात आचार्यश्रींचा फोटो आहे. जैन स्थानकात एक मूठ साखर ठेवण्याची इथे प्रथा आहे. याचबरोबर वर्षातून एकदा आचार्यश्रींच्या जन्मदीनी पाथर्डी परिसरातील छोट्या–मोठ्या गावांतून सुमारे दीडशे दिंड्या या स्थानकात येतात. सुमारे दहा ते बारा हजार व्यक्तींचा यात सहभाग असतो. यावेळी दिंडीतील सदस्यच येथील प्रवचन–कीर्तन–भोजन आणि अन्य सर्व गोष्टींचे नियोजन करतात, ही उल्लेखनीय गोष्ट आहे आणि ही परंपरा गेले कित्येक वर्षे सुरू आहे. या गावात कोणत्याही घरात शुभकार्य असेल त्यावेळी गुरूनमन हे आचार्यश्रीजींच्या स्थानकात जाऊनच केले जाते. गावात लग्न होऊन नवीन जोडपे आले तर आधी आचार्यजींचा आशीर्वाद घेतात आणि नंतर त्यांच्या धर्माप्रमाणे कुलाचार पार पडतात. असे हे आदर्श गाव महाराष्ट्र भूमीत एकमेव आहे आणि ही परंपराही अद्वितीय अशीच आहे. आचार्य आनंदऋषिजींच्या या अलौकिक जीवनानुबंधाचा हा इतिहास श्री प्रवीणऋषिजी म. सा. यांच्या मार्गदर्शनाखाली 'गुरू आनंद फाऊंडेशन'च्या माध्यमातून 'आनंद तीर्थ'च्या रूपात साकारला जातो आहे, ही जैन धर्मीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. या तीर्थाचे काम पाच टप्प्यात होत असून, पहिल्या टप्प्याचा लोकार्पण सोहळा झाला आहे, तर दुसरा टप्पा पुढच्या काही दिवसांतच होणार आहे आणि पुढच्या टप्प्यांचे काम प्रगति पथावर आहे.

**आचार्य भगवंत श्री आनंदऋषिजी म. सा.**

आचार्य आनंदऋषिजींचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी या गावी श्रावण शुक्ल प्रतिपदा १९५७ म्हणजेच २७ जुलै १९०० ला झाला. त्यांचे मूळ नाव नेमीचंद देवीचंद गुगलिया. मात्र बालपणीच त्यांचे पितृछत्र हरपले. आई हुलसाबाई यांच्या त्याग आणि तप या अनुशासित प्रणालीवर त्यांचे शिक्षण झाले आणि लहानपणा पासूनच त्यांच्यावर या गोष्टींचा प्रभाव राहिला. श्री रत्नऋषिजी महाराज चिचोंडी येथे आले असता छोट्या नेमीचंदच्या मातोश्रींनी त्यांना सामायिक आणि प्रतिक्रमण शिकण्यासाठी म. सा. यांच्याकडे पाठवले. याच काळात ज्ञान–ध्यान शिकण्याचे बीज नेमिचंदच्या मनात रुजले आणि त्यांना गुरूचे मार्गदर्शनही मिळाले. वि. सं च्या. १९७० मार्गशीर्ष महिन्यात – ७ डिसेंबर १९१३ ला म्हणजे वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी श्री रत्नऋषिजींनी नेमीचंदला 'जैन अर्हती दीक्षा' दिली आणि ते 'आनंदऋषि' झाले. ज्या उद्देशाने त्यांनी श्रमण जीवनाचा अंगीकार केला, त्याचे आचरण आणि प्रचार–प्रसारासाठी त्यांनी स्वतःला झोकून दिले. प्राकृत, संस्कृत, आगम, न्याय, व्याकरण आदी भाषांमध्ये आणि भाषाशैलींवर त्यांनी प्रभुत्व प्राप्त

केले. पुढील काळात या ज्ञानार्जनाचा त्यांनी समाजोन्नतीसाठी अत्यंत प्रभावीपणे उपयोग केला.

१९२० मध्ये त्यांनी अहमदनगर येथे जनतेला पहिले प्रवचन दिले. रत्नऋषिजी महाराज यांच्यासमवेत आनंदऋषिजी यांनी जैन धर्माचा प्रसार करण्यास सुरवात केली होती. अलिपुर येथे १९२७ ला मार्गदर्शक रत्नऋषिजी महाराजांच्या संथाराच्या समाधीनंतर आनंदऋषिजी उद्विग्न झाले. तथापि, कधीही दु:खी होऊ नका, आणि मानवजातीच्या कल्याणासाठी नेहमी कार्य करा हे त्यांचे गुरूवचन ते कधीच विसरले नाहीत. त्यांचे गुरुविना पहिला चातुर्मास १९२७ मध्ये हिंगणघाट येथे झाला. १९३१ पासून जैन धर्माचे दिवाकर चौथमलजी महाराज यांच्याशी धार्मिक चर्चा व्हायची, यावरूनच आनंदऋषिंमध्ये आचार्य बनण्याची क्षमता असल्याचे त्यांच्या लक्षात आले होते आणि आपल्या अनुयायांना ही इच्छा सांगितली. श्री आनंदऋषिजी यांनी श्रावकांना फायदा व्हावा म्हणून अनेक कार्यक्रम सुरू केले. श्री तिलोकरत्न स्थानकवासी जैन धर्मिक परीक्षा मंडळाची स्थापना अहमदनगरमध्ये २५ नोव्हेंबर १९३६ रोजी केली. १९५२ मध्ये राजस्थानमधील सादडी साधु संमेलनात आनंदऋषिजी यांना जैन श्रमण संघाचे प्रधानमंत्री म्हणून घोषित करण्यात आले.

१३ मे १९६४ आनंदऋषिजी श्रमण संघाचे द्वितीय आचार्य झाले. राजस्थानातील अजमेरमध्ये हा सोहळा पार पडला.

पुणे येथे १३ फेब्रुवारी १९७५ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी आनंदऋषिजी म. सा. यांना 'राष्ट्रसंत' या पदवीने सन्मानित केले. हे त्यांच्या ७५ व्या वाढदिवसाचेही वर्ष होते. याच वर्षी 'आनंद फाऊंडेशन'ची स्थापना झाली. १९८७ मध्ये पुण्यात साधू संमेलन झाले. आपल्या ९२ वर्षांच्या आयुष्यकालात आचार्य आनंदऋषिजी यांनी जैन धर्मासाठीच नाही तर सकल मानवजातीसाठी आध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि वैद्यकीय क्षेत्रासाठी मोठे कार्य केले आहे. २८ मार्च १९९२ मध्ये त्यांचे अहमदनगर येथे महानिर्वाण झाले.

**उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.**

आचार्य आनंदऋषिजी म.सा यांचे शिष्य आणि अलीकडच्या काळात जैन संतांमध्ये अर्हत् विज्जा प्रणेते श्री प्रवीणऋषिजी महाराज यांचे अधिष्ठान जैन धर्मामध्ये उच्चस्थानी आहे. अहमदनगर जिल्ह्यातील घोडेगाव येथे ७ ऑक्टोबर १९५७ रोजी श्री दगडुलालजी देसरडा आणि चंपाबाई देसरडा यांच्या पोटी त्यांचा जन्म झाला. बालपणापासून धार्मिक संस्कारांचा प्रभाव त्यांच्यावर अधिक होता. याच त्यांच्या स्थायीभावामुळे त्यांची वाटचाल धर्मसंस्कारांकडे आणि लौकिक विरक्तीकडे जाताना दिसून आली. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी २४ मार्च १९७४ रोजी त्यांनी आचार्य भगवंत श्री आनंदऋषिजी म. सा. यांच्याकडून भुसावळ येथे जैन अर्हत् ही दीक्षा प्राप्त केली. गुरुभक्ती आणि आगम स्वाध्याय या माध्यमातून त्यांनी आपले जीवन सार्थक केले आहे. आचार्य आनंदऋषिजी म. सा. यांच्या सहवासात त्यांनी १८ चातुर्मास केले. गुरूदेवांच्या अंतिम क्षणापर्यंत ते त्यांच्या चरणाजवळ होते, त्यांची असीम भक्ती आणि गुरूदेवांचा आशीर्वाद हीच त्यांची खरी संपत्ती आहे. आपल्या गुरूंच्या सहवासात त्यांनी अनेकानेक जैनागमांचा अभ्यास केला. अध्ययन, चिंतन आणि मनन या त्री-सूत्रीतून त्यांची वाणी पवित्र झाली आहे. सरस्वतीचा आशीर्वाद त्यांना मिळालेला आहे. परिणामी त्यांच्या प्रवचनांमधून त्यांची ही प्रतीभा ओजसतेने दिसून येते. समाजातील विसंगत रूढी-परंपरांना त्यांनी कडव्या शब्दांमध्ये समोर आणले आहे, आणि समाज वैचारिक, सामाजिक आणि वैचारिकदृष्ट्या सदृढ करण्याचे काम ते करीत आहेत. अध्ययन आणि ध्यान यासाठी त्यांनी २००३ च्या सुमारास इंदौर, मध्यप्रदेश येथे १३ महिन्यांसाठी

एकान्तवास साधना केली. २००४ मध्ये त्यांना 'उपाध्याय' पदवी प्रदान केली. त्यांची तपाराधना आणि आत्म साधना हे त्यांच्या जीवनाचे विशेष आहे. दिवसाचे १५ ते १६ तास ते विविध कार्यक्रमां मध्ये व्यस्त असतात.

प्रत्येक वर्षावास समाजजीवनोद्धारा साठी त्यांचे पवित्र कार्य ठरलेला आहे. महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रेदश, दिल्ली, उत्तरप्रदेश, हरियाणा, पंजाब, आंध्र तामिळनाडू, कर्नाटक आदी राज्यांत त्यांच्या मंगलमय यात्रेने लोक प्रभावित झाले आहेत. भगवान महावीरांच्या वीर वाणीचा प्रचार आणि प्रसार या दोन्हींसाठी त्यांचा आजवर हजारो किलोमीटर पायी प्रवास झाला आहे. भगवान महावीरांचे जीवनदर्शन, त्यांचा संदेश प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याचे त्यांचे लक्ष्य असून महावीर-गाथाच्या रूपाने ते आपल्या प्रवचनातून याचे कार्य करीत आहेत. त्यांच्या ओजस वाणीतून महावीर जीवनगाथा जेव्हा बोलली जाते तेव्हा लोकमंत्रमुग्ध होतात. याच अनुषंगाने दिवाळीत भगवान महावीरांच्या उत्तराध्ययन सूत्राचे २१ दिवसांचे अनुष्ठान एक अभिनव सोहळाच असतो. भगवान महावीर आणि आगमवाणी यांच्या माध्यमातून त्यांनी सम्यक आस्थेचा दीप प्रत्येक मनामनांत प्रज्ज्वलित केला आहे.

प्राचीन-आधुनिक धर्मस्थिती आणि विज्ञान अध्यात्म आणि तंत्रज्ञान यांचे महत्त्व लक्षात घेऊन आपल्या प्रवचनातून ते समाजातील अनिष्ट रूढी दूर करण्याचे कार्य करीत आहेत. पारंपरिक आस्था आणि सांस्कृतिक जीवन-मूल्य यांच्यातील व्यवस्थेत समन्वय साधण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय ठरला आहे.

नवकार कलश ही त्यांची प्रत्येक घराघरांत रुजलेली एक अलौकिक अशी प्रयोगसिद्ध व्यवस्था आहे. याबरोबरच गौतम निधी लब्धी कलशाच्या माध्यमातून त्यांनी घराघरांत स्व-धर्मी भक्तीचे बीज रुजवले आहे. मानवसेवा हे 'गौतम निधी'चे प्रमुख व्रत आहे. मोठ्या शहरांमधीलच नाही तर गावोगावी अशा गौतम निधी कलशांची स्थापना करण्यात आली आहे. साधारण १०८ जणांचा ग्रूप त्यासाठी केला जातो. नवकार मंत्र म्हणून या गौतम निधीच्या माध्यमातून घरातील सर्व सदस्य एका कलशात नित्यनियमाने काही विशिष्ट रक्कम जमा करते. घरातील अगदी छोटे बालकही या उपक्रमात सहभागी होतो. यातून एक सामाजिक बांधीलकी आपल्यामध्ये निर्माण होते. हा निधी वर्षातून दोनदा सर्वत्रच गोळा केला जातो आणि याचा उपयोग समाजातील हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी, असाध्य आजारात उपचारासाठी लागणाऱ्या आरोग्यसेवेसाठी, अथवा एखाद्या लघुउद्योगाला पाठबळ देण्यासाठी केला जातो. सामाजिक ऋण दूर करण्यासाठी केलेला या उपक्रमात भारतभरातून जैन बांधवांचा मोठा सहभाग दिसून येतो आहे. आरोग्यसेवेसाठी दिली जाणारी मदत ही त्या व्यक्तीच्या किंवा तिच्या नातेवाइकांच्या हातात दिली जात नाही, तर या रकमेतून रुग्णालयाच्या मॅनेजमेंटशी चर्चा करून बिल रुग्णालयात थेट भरले जाते. या निधीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ही रक्कम कोणाला दिली गेली याचा ऊहापोह कधीच केला जात नाही. मात्र शतप्रतिशत या राशीचा उपयोग समाजोपयोगी कारणासाठीच केला जातो.

वडगाव शेरी, पुणे येथे तीस साधर्मिक बांधवासाठी **'गौतमालय'**ची निर्मिती झाली आहे. लिफ्ट, सर्व सुविधा युक्त भव्य अपार्टमेंट निर्माण करुन गरिब व गरजू साधर्मिक परिवारांना राहण्यासाठी दिले आहेत.

गौतम निधीच्या माध्यमातून यावर्षीच्या कोविड-१९ या महाभयंकर साथीच्या आजारापासून संरक्षण करण्यासाठी देखील मदत करण्यात आली आहे. कुटुंबांना धान्याचे वाटप, मास्क, पीपीई कीट यांचे वाटप इतर राज्यांतील मजुरांसाठी दोन वेळच्या जेवणाची सोयही केली गेली आहे.

पू. श्री प्रवीणऋषिजी म.सा. यांनी अर्हम् विज्जा, पुरुषाकार ध्यान साधना, गर्भ संस्कार, युगल धर्म असे अनेक उपक्रम सुरु केले आहेत व या कार्यक्रमात हजारो लोक सहभागी झाले आहेत.

श्री प्रवीणऋषिजी म. सा. यांचे हे कार्य अखंडपणे तेवत असलेला दिवा आहे.

**'आनंद तीर्थ' निर्मितीचा संकल्प**

जैन धर्मियांसाठी एक श्रध्दा तीर्थ, मानवसेवा तीर्थ निर्माण करण्याचा संकल्प म्हणजेच गुरु आनंद तीर्थ. मक्का मदीना, व्हॅटिकन सिटी सारखे एक श्रध्दातीर्थ निर्माण करुन जैन समाजाला एक दिशा देण्यासाठी एक तीर्थ निर्मिती म्हणजेच गुरु आनंद तीर्थ.

गुरु आनंद तीर्थच्या माध्यमातून जैन समाजाला एक श्रध्दास्थान, दिशा देणारे स्थान निर्माण करण्याचा संकल्प गुरु आनंद तीर्थच्या माध्यमातून केला आहे. तसेच आचार्य भगवंत यांचे जैन समाजा प्रती असलेले कार्य व मानव सेवेचे कार्य गुरु आनंद तीर्थच्या माध्यमातून पुढे चालवले जाणार आहे.तसेच प.पू. प्रवीणऋषिजी म.सा. च्या अनेक कार्यक्रमाचे म्हणजेच अर्हम् विज्जा, पुरुषाकार ध्यान साधना, नवकार कलश, गौतमनिधी, युगलधर्म आदि कार्यक्रमांचे केन्द्रीय संचलन गुरु आनंद तीर्थच्या माध्यमातून केले जाणार आहे.

तसेच जैन समाजाच्या असलेल्या वेगवेगळ्या परंपरा, रुढी यांची अध्ययन करुन समाजाला नवीन दिशा देण्यासाठी गुरु आनंद तीर्थची निर्मिती केली जात आहे.

आचार्यांच्या या जीवनकार्याचा आणि त्यांच्या सामाजिक-धार्मिक कार्याचा एक सुंदर इतिहास आहे आणि हा इतिहासच आता 'आनंद तीर्थ' या सुंदर तीर्थाच्या रूपाने समाजापुढे अहमदनगर मधील पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी येथे साकारतो आहे. उपाध्याय प्रवीणऋषिजी म. सा. यांच्या या संकल्पनेला आलेले मूर्त स्वरूप आणि त्याला मिळालेला प्रतिसाद ही खऱ्या अर्थाने गुरूदक्षिणा ठरत आहे.

**आनंद तीर्थ – सात तीर्थ**

'आनंद तीर्थ' - सात तीर्थांचा एक सुंदर समूह आहे. या 'गुरू आनंद फाउंडेशन'चे सदस्य व श्री. प्रवीणऋषिजी म. सा. यांच्या प्रेरणेतून व संकल्पनेतून या तीर्थाची निर्मिती सुरू आहे.

ही तीर्थ निर्मिती जैन धर्मीयांसाठी एक सौभाग्याची बाब आहे. हे तीर्थ 'आनंद-तीर्थ' आहे, त्यामुळेच या तीर्थाचे आधिष्ठान वेगळेच असणार आहे. एक सुंदर 'स्थापत्य-इतिहास' या निमित्ताने निर्माण होत आहे. या तीर्थामध्ये श्रद्धा तीर्थ, संस्कार तीर्थ, सेवा तीर्थ, अमृत तीर्थ, ज्ञान/विद्या तीर्थ, कला तीर्थ आणि विधान तीर्थ अशा सात प्रमुख तीर्थांचा समावेश असून, प्रत्येक तीर्थाचे विशेष वेगवेगळे आहेत.

**श्रद्धा तीर्थ :**

शुभ्र स्फटिकाचे, संगमरवरीमध्ये राजस्थानी कलाकुसरीचा उत्तम नमुना असलेले हे आचार्यजींचे गुरुचरण तीर्थ आहे. या तीर्थाच्या ठिकाणी श्रावक/भक्तगण आपली साधना आणि सत्संकल्पांचे आचरण करू शकणार आहेत.

**संस्कार तीर्थ :**

या तीर्थामध्ये नवकार कलश तीर्थ, 'अर्हम्' महामंत्र दीक्षा, श्रुत पीठ यांचा समावेश आहे. हे एक सुंदर आध्यात्मिक पीठ आहे. पंचपरमेष्ठींची आराधना या शक्तीपीठा मार्फत होणार आहे. ज्यामुळे श्रावकांना त्यांची साधना आणि अनुष्ठान करण्यासाठी एक ध्यानमंदिरच मिळणार आहे. आत्मशुद्धीसाठी ते फलदायी ठरणार आहे. या ठिकाणी पूजा-कर्मकांड अथवा कोणतेही अवडंबर असणार नाही. केवळ श्रध्दाजागरण आणि त्या अनुषंगाने आत्मशांती अशीच रचना या तीर्थाची आहे.

या बरोबरच नवकार तीर्थ कलशाची अजून एक सुंदर संकल्पना आहे- जर एखाद्या परिवाराला आपल्या घरामध्येच या नवकार कलशाची स्थापना करायची असेल तर त्यांच्यासाठी पंचधातूचे नवकार कलश येथे उपलब्ध होणार आहेत. लहानपणापासून जैन तत्त्वज्ञान

आणि नवकार मंत्राचे संस्कार मुलांवर होणे गरजेचे आहे. यासाठी ही नवकार कलशाची संकल्पना महत्त्वाची ठरणारी आहे.

याबरोबरच 'अर्हम्' महामंत्र दीक्षा व्यवस्था आणि श्रुतपीठ म्हणजे भगवान महावीरस्वामी यांचे श्री उत्तराध्ययन सूत्र आराधना पीठ येथे निर्माण केले जात आहे. याबरोबरच जैन तत्त्वज्ञानाचे संस्कार हे मुळातच गर्भापासून होणे आवश्यक आहे, ही मुनिश्री प्रवीणऋषिजींची शिकवण आहे आणि त्यासाठीच या परिसरात गर्भसंस्कार या गोष्टीवर विशेष भर दिला जाणार आहे. जन्मापासून-मृत्यूपर्यंत संस्कारमय जीवनाचे मोल यातून प्रतीत होणार आहे.

**सेवा तीर्थ :**

'सेवा तीर्थ' - या नावातच खूप काही सामावलेले आहे. जैन धर्माचे एक तत्त्वच आहे- समाजसेवेचे असिधाराव्रत या धर्माने अंगीकारले आहे. त्यामुळे 'गौतमलब्धी प्रतिष्ठान'च्या माध्यमातून सेवा, शिक्षण यांचे अनुष्ठान मिळणार आहे. यासाठी देखील गौतमलब्धी कलशाची निर्मिती केलेली आहे. 'आनंद तीर्थ' येथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मानवसेवा करण्याचे भाग्य या योजनेतून मिळणार आहे. या अनुषंगाने रुग्णालय (चिकित्सालय), अनाथ-असहाय मुला-मुलींसाठी विकास पीठ, अतिथी गृह, भोजनशाला या सेवा देता येणार आहेत.

**अमृत तीर्थ :**

हे तीर्थ एका विशेष उद्देशाने निर्माण केले गेले आहे. येथे वृद्धजनांची सेवा तर होणार आहेच; पण त्याचबरोबर त्यांच्या अनुभवांचा, ज्येष्ठतेचाही लाभ इतरांना मिळावा, या उद्देशाने उपक्रम राबवले जाणार आहेत.

**संलेखना**

जीवन जगण्याची जशी एक कला असते; तसेच मृत्यू स्वीकारणे ही देखील एक कला आहे. 'इट्स अ आर्ट ऑफ डेथ' अशी संलेखना या शब्दाची व्याख्या केली, तर ती अधिक अर्थपूर्ण होईल. या 'गुरु आनंद तीर्थ' मध्ये ५ एकर जागेत असेच एक सुंदर तीर्थ निर्माण होत आहे, संलेखना तीर्थ. या ठिकाणी २४ खोल्या आहेत. ही प्रत्येक खोली तीर्थंकरांच्या तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. इथे मृत्यूची साधना करता येणार आहे. परमात्म्याशी संवाद साधत एका सुंदर अनुभूतीत जगण्याची ही साधना आहे आणि ती सर्वांसाठी खुली आहे. 'ओपन टू ऑल' असे त्याचे स्वरूप आहे. हे एक 'रीसर्च सेंटर' (संशोधन केंद्र) आहे, इथल्या साधनेत नवकार मंत्राचा आध्यात्मिक आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे सोपे होणार आहे. या ठिकाणी वड-पिंपळ-नीम अशा तीन प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे. हा एक 'त्रिवेणी संगम' आहे. २४ तास ऑक्सिजनचा पुरवठा करणारी ही तीनही झाडे आपल्याला नवचैतन्य, ऊर्जा देणारी आहेत. या झाडांच्या सावलीत बसून साधना करणे सहज शक्य होणार आहे- ही साधना तुम्हाला सांगत आहे की, प्रसन्न मनाने जगा, सार्थ भावनेने वागा आणि शांतीने जा...!'

**ज्ञान/विद्या तीर्थ :**

ज्ञानसंवर्धन आणि प्रसारण असे दोन्ही उद्देश या तीर्थाचे आहेत. भगवान महावीरस्वामींनी जे मंगलकारी तत्त्वज्ञान जगासमोर मांडले आहे ते देश-विदेशांत पोहोचणे सद्यःस्थितीत गरजेचे आहे. हे तत्त्वज्ञान विश्वव्यापी होण्याच्या दृष्टिने या तीर्थाचे काम मोठ्या प्रमाणात चालणार आहे. याचबरोबर अनेक शैक्षणिक प्रकल्पांची योजनाही येथे आहे. शाळा, महाविद्यालयां बरोबरच अनेक तांत्रिक आणि व्यावसायिक शैक्षणिक उपक्रमांची मांडणी आणि त्याद्वारे समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिक्षणाचे मार्ग उपलब्ध व्हावेत यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. 'करस्पॉन्डन्स एज्युकेशन' हे इथले विशेष राहणार आहे.

**कला तीर्थ :**

जैन धर्म, दर्शन इतिहास आणि गुरूदेवांची जीवनगाथा यांवर आधारित असे हे एक आगळेवेगळे तीर्थ निर्माण होत आहे. थोडक्यात म्हणजे हे एक

संग्रहालय (म्युझियम) आहे, जे आचार्यांची जीवनगाथा आपल्या समोर आणणारे आहे.

**विधान तीर्थ :**

विधान तीर्थ मानव समाज बांधवांसाठी निर्मित आहे. व्यक्ती, परिवार आणि समाज यांना एकत्रित करून त्यांच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट समोर ठेवून केंद्रीय व्यवस्था असणे गरजेचे असते. त्या दृष्टीने विचार करून या तीर्थाची निर्मिती येथे करण्यात आली आहे. समाजाला सदृढ करणे, त्याचे भरण-पोषण सात्विक आणि संयमी वृत्तीने करणे हे या तीर्थाचे विशेष आहे.

यामध्ये अजून एक संकल्पना आहे. येथून दीड किलोमीटर अंतरावर असणाऱ्या डोंगराच्या पायथ्याशी एक भव्य ध्यान मंदिर सुरू करण्याचा मानस आहे. यामध्ये विपश्यना केंद्राच्या धर्तीवर शांत आणि आत्मकल्याणाच्या दृष्टीने विचार केला जाणार आहे. त्यात लौकिक जीवनात यशस्वी होताना ध्यान-तपस्या आणि चारित्र्य यांचा सम्यकतेने विचार आविर्भूत आहे.

३५ एकर जागेत निर्मीत या तीर्थस्थानी हजारो विविध प्रकारच्या झाडांची येथे लागवड करण्यात आली आहे.

असे हे भव्य-दिव्य 'आनंद-तीर्थ' निर्माण होणे ही एक परम सौभाग्याचीच बाब आहे. या तीर्थाच्या रूपाने जैन धर्मीयांचे एक वेगळे 'आनंद-स्व-रूप' वैश्विकतेने समोर येत आहे.

या गुरु आनंद तीर्थची संकल्पना जाहीर केल्यानंतर पहिल्याच टप्प्यात सुमारे रु. ३५ कोटीच्या देणग्या भाविकांनी जाहीर केल्या व तीर्थ निर्मितीसाठी चिचोंडी, शिराल येथे ३५ एकर जागा खरेदी करण्यात आली असून सर्व शासकीय परवानग्या घेतल्या नंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. पहिल्या टप्प्यामध्ये गुरुचरण तीर्थ, धर्मसभा मंडप, भोजन शाळा, अतिथीगृह, कर्मचारी निवास, रस्ते व वृक्षारोपणाचे काम पूर्ण करण्यात आले व डिसेंबर २०१७ मध्ये हजारो भाविकांच्या साक्षीने पहिल्या टप्प्याचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला व त्यानंतर दुसऱ्या टप्प्याचे काम सुरु करण्यात आले. त्यामध्ये स्नेहालय (वृध्दाश्रम), साधु स्थानक, साध्वी स्थानक, सिमेंट रोड, पाणी पुरवठा व इंफ्रास्ट्रक्चरची सर्व कामे पूर्ण करण्यात आली असून दुसऱ्या टप्प्याचा लोकार्पण सोहळा १ जानेवारी २०२१ ला करण्याचा संस्थेचा मानस आहे व त्याच दिवशी पंचतीर्थ म्हणजेच नवकार कलश, गौतम निधी तीर्थ, श्रुत पीठ, गौतमकलश तीर्थ, आनंद म्यूझियम मध्यभागी केन्द्रीय तथा गुरुचरण तीर्थ या तीर्थच्या भूमीपूजनाचा समारोह १ जानेवारी २०२१ ला करण्याचा संस्थेचा मानस आहे.

**स्नेहालय :** १ जानेवारी २०२१ पासून संस्थेत स्नेहालय सुरु करण्याचा मानस आहे. त्यामध्ये जेष्ठ नागरिकांना आचार्य भगवंतांच्या जन्मभूमीत राहाण्याचा लाभ मिळणार आहे.

**वर्षीतप :** तसेच गुरु आनंद तीर्थ येथे गेली सात वर्षे सातत्याने वर्षीतप पारण्याचे आयोजन केले जात आहे व त्याचा हजारो तपस्वीनी लाभ घेतला आहे.

या तीर्थाच्या अ‍ॅडमिनिस्ट्रेशनचा उल्लेख इथे आवर्जून करावा असा आहे. या तीर्थ निर्मिती मध्ये 'गुरू आनंद फाउंडेशन'चे काम अत्यंत उल्लेखनीय आहे. या फाउंडेशनचा सुरुवातीपासूनचा एक नियम आहे. या कामाच्या संदर्भात सर्वेक्षणासाठी जाताना स्व-खर्च महत्त्वाचा ठरलेला आहे. संस्थेच्या खर्चातून कोणतेही काम नाही, या तत्त्वामुळे 'स्व-खर्चा'ची शिस्त सदस्यांनी अंगीकारली आहे आणि त्यामुळेच या कार्यात अधिकाधिक पारदर्शकता दिसून येते आहे.

चिचोंडी येथे होणाऱ्या या भव्य अशा वास्तूची रचना, यासाठी येणारा खर्च आणि त्याचे सगळे नियोजन हे मुनिश्री प्रवीणऋषिजी म. सा. यांच्या मार्गदर्शनाखाली 'गुरू आनंद फाउंडेशन'च्या माध्यमातून होत आहे. यामध्ये सहभागी होण्यासाठी आधार स्तंभ सदस्य, प्रमुख स्तंभ सदस्य, आश्रयदाता सदस्य आणि आजीवन सदस्य, एक वीट समर्पण अशा पाच स्तंभांवर आधारित फंडाच्या आणि देणगीच्या

रूपात येणाऱ्या आर्थिक पायांवर ही वास्तू उभी राहत आहे.

**आधार स्तंभ :**

आधार स्तंभ सदस्यांच्या नामावलीत या संस्थेसाठी १ कोटी १ रुपयांचे दान संकलित केले जात आहे. हे दानश्री या संस्थेचे तहहयात सदस्य राहणार असून, त्यांनी नामनिर्देश (नॉमिनेशन) केलेले त्यांचे सदस्य वंशपरंपरेने या संस्थेशी कायम स्वरूपी निगडित राहणार आहेत. या व्यक्तीचे नाव प्रवेशद्वारावर आधार स्तंभाच्या शिळेवर कोरले जाणार अूसन संस्थेच्या कार्यकारिणी मध्ये तीन सदस्य निवडले जाणार आहेत.

**प्रमुख स्तंभ :**

दुसरा स्तंभ आहे प्रमुख आधार स्तंभ, जो ५१ लाख रुपयांचा आहे. यामध्ये पहिल्या स्तंभातील तीनही गोष्टी समान आहेत; पण कार्यकारिणीवर दोन सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे.

**आश्रयदाता स्तंभ :**

तिसरा स्तंभ हा ११ लाख रुपयांचा आश्रयदाता हा आहे. यामध्ये दानश्री हे तहहयात संस्थेचे सदस्य राहणार आहेत. त्यांचे नॉमिनी संस्थेचे सदस्य राहतील. प्रवेशद्वारावरील आश्रयदाता स्तंभावर त्यांचे नाव असेल आणि आश्रयदाता सदस्यांमधून पाच सदस्यांची नेमणूक होणार आहे.

**आजीव स्तंभ :**

चौथा स्तंभ आजीवन स्तंभ आहे- जो दोन लाख रुपयांचा आहे. यामध्ये दानश्री हे तहहयात संस्थेचे सदस्य राहणार असून, त्यांचे नाव प्रवेशद्वारावरील शिळेवर कोरले जाणार आहे आणि त्यांचे पाच सदस्य या संस्थेच्या सदस्यांमध्ये निवडले जाणार आहेत.

**एक वीट समर्पण :**

याबरोबरच १ लाखाची एक वीट ही संकल्पनाही या योजनेमध्ये असून त्यानुसार प्रत्येक विटेचे मानकरी होण्याचे सौभाग्य हे समाज बांधवांना मिळणार आहे.

यावर्षी (२०२०) पर्युषण पर्वाच्या काळात सुमारे १४०० विटांचे दान समाजबांधवांकडून झाले आहे. संपूर्ण भारतातून जम्मू-काश्मीर, कोलकता, मुंबई, पुणे, अहमदनगर, सूरत, इंदौर, हैदराबाद, चेन्नई, बैंगलौर आदी भागांतून असे दान आले आहे. परदेशांतूनही दानाचा ओघ येत आहे. समाजातील अनेक परिवार आपल्या घरातील जेवढे सदस्य आहेत तेवढ्या विटाचे दान देत आहे. या एक वीट दानदात्यातून लकी ड्रॉ काढण्यात येणार असून प्रमुख तीर्थाच्या भूमिपूजनाचा लाभ त्यांना मिळणार आहे.

एकूणच समाजातील प्रत्येकाचा हातभार या वास्तूच्या निर्मितीत आहे आणि तीच या वास्तूची खरी ओळख आणि गुरूचरणी अर्पण केलेली गुरूदक्षिणा असणार आहे.

आज देशभर जैन समाजाने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. मानवजातीच्या उपकारासाठी वेळोवेळी धावून जाणे आणि आपले कार्यकर्तृत्वाने सकल मानवासाठी काम करणे हे जैन समाजाचे वेगळेपण टिकवून ठेवले आहे. या भव्य ऐतिहासिक वास्तू निर्मितीत देखील हा उद्देशच समोर ठेवला गेला आहे. ज्ञान-धर्म-चारित्र्य-तपस्या या भगवान महावीरांनी सांगितलेल्या आणि गुरू आनंदऋषिजींनी दिलेल्या वारशाच्या चतुःसूत्रीवर उभारल्या जाणाऱ्या या वास्तूची धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अशी ओळख ही केवळ महाराष्ट्रात किंवा भारतातच नाही तर वैश्विक दृष्टिकोनातून महत्त्वाची ठरणार आहे. ●

**✻ प्रकल्प स्थान ✻**

चिचोंडी (शिराल), ता. पाथर्डी, जि. अहमदनगर.

**✻ कार्यालय ✻**

**गुरु आनंद फौंडेशन**

७, दुग्गल प्लाझा, प्रेमनगर, बिबवेवाडी रोड,
पुणे ४११०३७.
फोन : ०२०-२४२२०६८१/२,
फॅक्स : ०२०-२४२१९२८८
मो. : ९४२२००१७५१, ९८२२०२६७४७,
९८२२०३९९२१ ●

# दीपावली पूजन विधी

त्योहारों में सर्वश्रेष्ठ त्योहार दीपावली क्योंकि इसे भारतभर में बड़े उत्साह और उमंग के साथ मनाया जाता है । यह दीपकों का, प्रकाश का, चैतन्य का, शुभ संकल्पों का मंगलमय त्यौहार है ।

जैन समाज में इस त्योहार का विशेष महत्त्व इसलिए है कि इसी दिन अमावस्या को भगवान महावीर स्वामी का निर्वाण हुआ था । वे जन्म-मृत्यु के दुखों से मुक्त होकर मोक्ष गामी हुए । चतुर्दशी और अमावस्या दो दिन लगातार भ. महावीर स्वामी जनसमुदायों को अंतिमदेशना (उपदेश) देते रहे । वह उपदेश ही उत्तराध्ययन सूत्र है । जिसका पठन-पाठन श्रवण इन दिनों में किया जाता है । कई महानुभाव बडी श्रध्दा के साथ उपवास करते है । भ. महावीर का जाप करते हैं । पौषध के साथ उपवास करते हैं । कार्तिक सूद प्रतिपदा के दिन प्रथम गणधर गौतमस्वामीजी को केवलज्ञान प्राप्त हुआ । नए वर्ष के प्रात:काल में गौतमस्वामीजी का जाप किया जाता है । सभी भक्त जन सुबह गुरु भगवंतों के मुखारविंद से शुभ मांगलिक श्रवण करते है । मंत्र गर्भित स्तोत्र का श्रवण करते हैं। इसके बाद ही अपने कार्य का प्रारंभ करते हैं ।

दीपावली त्योहार हमारे लिए एक महत्त्वपूर्ण आध्यात्मिक त्योहार है ।

---

## दीपावली पूजन विधी

सर्व प्रथम घर के सभी सदस्य मंगलभावना के साथ तीन बार नवकार महामंत्र का भक्तिसे भर कर उच्चारण करे ।

**नवकार महामंत्र**

णमो अरिहंताणं, णमो सिध्दाणं, णमो आयरियाणं,
णमो उवज्झायाणं, णमो लोए सव्वसाहूणं,
एसो पंच णमोक्कारो, सव्वपावप्पणासणो,
मंगलाणं च सव्वेसिं, पढमं हवइ मंगलं ।।

**तीर्थंकरों को वंदन**

समवशरण का स्मरण कर पूर्व और उत्तर दिशा के बीच ईशान्य दिशा में महाविदेह क्षेत्र है वहाँ बीस विहरमान तीर्थंकर वर्तमान में विराजमान है अत: अत्यंत भावपूर्ण हृदय से उन्हें तीन बार वंदन नमन करें ।

**गुरु भगवंत को वंदन**

जो गुरु आपने माने हैं उन्हें श्रध्दापूर्वक वंदना करना ।

---

- शुभ मुहूर्त पर गद्दी या गालीचा बिछाकर भ. महावीर स्वामीजी, श्री गौतम स्वामीजी, श्री लक्ष्मी देवी, श्री सरस्वती देवी के फोटो पूर्व या उत्तर दिशा में रखें ।
- गद्दीपर नई बहियाँ (नोट बुक), बिल बुक, चेक बुक, सुवर्ण-चांदी या धातु के देवी देवताओं के सिक्के, नया पेन पूजा की सामग्री रखें ।
- पूजा के लिए साहित्य - खाने के पान डंढल सहित, सुपारी, लौंग, इलायची, कुंकुम, वासक्षेप अक्षदा (चावल), श्रीफल (नारियल), फूल, घी का दीया, धूप, अगरबत्ती, जल, फल, ईख (Sugar cane), नैवद्य, लक्ष्मी झाडु, लाभ (लाह्या) बत्तासा, मोली, आरती के लिए कपूर।
- पूजा करनेवाले घर का मुखिया तीन नवकार मंत्र का जाप करके हाथ में मोली बाँधे । फोटो, सिक्के इनको तिलक लगाएँ अक्षदा चढावे ।
- गद्दी की दाहिनी तरफ घी का दीया और बायीं तरफ धूप अगरबत्ती लगाएँ । और साईड में ईख (Sugar cane) खडा रखें ।

**॥ ॐ अर्हम् नमः ॥**

**श्री**

**श्री श्री**

**श्री श्री श्री**

**श्री श्री श्री श्री**

**श्री श्री श्री श्री श्री**

**श्री श्री श्री श्री श्री श्री**

**श्री श्री श्री श्री श्री श्री श्री**

**श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री**

**श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री**

**श्री शुभ 卐 श्री लाभ**

**श्री आदिनाथाय नमः श्री शांतीनाथाय नमः**

**श्री पार्श्वनाथाय नमः श्री महावीराय नमः**

**श्री सद्गुरूभ्यो नमः**

श्री गौतमस्वामी की लब्धि, श्री भरतजी की ऋध्दि, श्री अभयकुमारकी बुध्दि, श्री कयवन्नाजीका सौभाग्य, श्री धन्ना शालिभद्रजीकी संपत्ति, श्री बाहुबलीजीका बल, तथा श्री श्रेयांसकुमार की दानवृत्ती प्राप्त होवे !

श्री जिनशासन की प्रभावना होवे !

॥ श्री सरस्वती देवी नमः ॥ श्री महालक्ष्मी देवी नमः ॥

**नूतन वर्ष**

**वीर संवत २५४७, विक्रम संवत २०७७**

**कार्तिक सुद १ सोमवार दि. १६/११/२०२०**

**पूजन दिन शनिवार दि. १४/११/२०२०**

卐

- नवकार मंत्र बोलते-बोलते दवात, कलम, दीया, कलश, लक्ष्मी, ईख (Sugar cane) इ. को मोली बांधे । कुंकुम तिलक करें ।
- नई बही के पहले पन्नेपर बाजु की चौकट का मायना लिखें ।

लिखने के बाद कुंकुम से स्वस्तिक निकालें । नई बहियाँ पिछले वर्ष की अकाऊंट की एक बही, बिल बुक, चेक पुस्तक, लक्ष्मी इ. सभीपर डंढल सहित एक पर एक दो पान रखें । उसपर एक रुपया और उसपर सुपारी, लौंग, इलायची रखें । हाथ में पानी लेकर बही के चारों ओर घुमावे । वासक्षेप, कुंकुम मिश्रित चावल के दाने हाथ में लेकर निम्न श्लोक और मंत्र बोलें ।

**मंगलं भगवान वीरो, मंगलं गौतम प्रभुः ।**
**मंगलं स्थूलीभद्राद्या, जैन धर्मोस्तु मंगलम् ।**

**मंत्र - ॐ आर्यावर्ते, आस्मिन् जंबूद्वीपे दक्षिणार्धभरते भरतक्षेत्रे-भारतदेशे (पूना) नगरे ममगृहे श्री शारदा देवी, श्री लक्ष्मीदेवी आगच्छ आगच्छ, तिष्ठ तिष्ठ स्वाहा ।**

अक्षदा बहीपर अर्पण करें । बाद में निम्नलिखित स्तुति का पठन करें ।

**॥ स्तुती ॥**

**स्वश्रीयं श्रीमद् अरिहंता, सिद्धः पुरीपदम्,**
**आचार्यः पंचधाचारं, वाचकां वाचनांवराम्।**
**साधवः सिद्धी साहाय्यं वितन्वन्तु विवेकिनाम्,**
**मंगलानां च सर्वेषां, आद्यं भवति मंगलम् ।**
**अर्हमित्यक्षरं माया, बीजं च प्रणवाक्षरम्,**
**एवं नाना स्वरूपं च, ध्येयं ध्यायन्ति योगिनः।**
**हृत्पद्मं षोडशदलं, स्थापितं षोडशाक्षरम्**
**परमेष्ठिस्तुते बीजं, ध्यायेक्षरदूरदं मुदा ।**
**मंत्रणामादिमं मंत्रं, तंत्र विघ्नौघ निग्रहे,**
**ये स्मरन्ति सदैवेनं, ते भवन्ति जिन प्रभा ॥**

तत्पश्चात् निम्नलिखित मंत्र जप करते-करते **जल, चंदन, पुष्प (फूल), धूप, दीप, अक्षदा (चावल), फल, नैवेद्य** इन आठ वस्तुओं से बही पूजन करें ।

ॐ ऱ्हीं श्री भगवत्यै, केवलज्ञान स्वरूपायै, लोकालोक प्रकाशिकायै, सरस्वत्यै, लक्ष्मयै (जलं) समर्पयामि स्वाहा ।

दूसरी बार यही श्लोक बोलते हुए जल की जगह चंदन बोले इस प्रकार आठों ही वस्तुओं के नाम लेकर आठ बार यह श्लोक बोलें ।

पूजा में सभी सदस्य खडे होकर निम्नलिखित प्रार्थना बोलें ।

**।। श्री सरस्वती स्तोत्र ।।**

**सकल लोक सुसेवित पंकजा**
**वर यशोर्जित शारद कौमुदी,**
**निखिल कल्मष नाशन तत्परा**
**जयतु सा जगतां जननी सदा ।।**
**कमल गर्भ विराजित भूधना,**
**मणि किरीट सुशोभित मस्तका,**
**कनक कुंडल भूषित कर्णिका,**
**जयतु सा जगतां जननी सदा ।।**
**वसुहरिद् गज संस्नपितेश्वरी**
**विधृत सोमकला जगदीश्वरी,**
**जलज पत्र समान विलोचना**
**जयतु सा जगतां जननी सदा ।।**
**निज सुधैर्य जितामर भूधरा,**
**निहित पुष्कर वृंदल सत्कारा**
**समुदितार्क सदृतनु बल्लिका,**
**जयतु सा जगतां जननी सदा ।।**
**विविध वांछित कामदुधाद्भूता,**
**विशद पद्म ह्रदान्तर वासिनी**
**सुमति सागर वर्धन चंद्रिका,**
**जयतु सा जगतां जननी सदा ।।**

**।। श्री लक्ष्मी स्तोत्र ।।**

**नमोस्तुते महालक्ष्मी महासौख्य प्रदायिनी**
**सर्वदा देही मे द्रव्यं, दानाय मुक्ती हेतवे ।। १ ।।**
**धनं धान्य धरां हर्ष, कीर्तिम्, आयु: यश: श्रियम्**
**वाहनाम् दन्तिन् पुत्रान, महालक्ष्मी प्रयच्छ मे ।।२।।**
**यन्मया वांछितं देवी, तत्सर्वं सफलं कुरू**
**न बान्ध्यन्ता कुकर्माणि, संकटान्मे निवारय ।।३।।**

**।। प्रार्थना ।।**

**सुंदर आरोग्य निवास करे दृढ तन में ।**
**आशा, उत्साह, उमंग भरे शुचि मन में ।**
**न हो अनुचित योग प्रयोग धन साधन में ।**
**उत्कृष्ट उच्च आदर्श जगे जीवन में ।**
**तम मिटे, ज्ञानकी ज्योति जगत में छाये ।**
**प्रभु ! दिव्य दिवाली भव्य भाव भर लाये ।**

इसके बाद एक थाली में दीया लेकर कपूर से आरती करे - निम्न आरती बोले ।

**।। आरती ।।**

**सकल जिनंद नमी करी, जिनवाणी मन लाय ।**
**सरस्वति लक्ष्मी करू आरती, आतम सुगुरू पसाय ।।**
**ज्ञान जगत में सार हैं । ज्ञान परम हितकार ।**
**ज्ञान सूर्य से होता है, दुरित तिमिर अपहार ।।**
**श्री सरस्वती प्रभाव से, लहे जगत सम्मान ।**
**ज्ञान बिना पशु सारिखा, पावे अति अपमान ।।**
**श्रद्धा मूल क्रिया कही, ज्ञान मूल है तास ।**
**पावे शिव सुख आतमा, इससे अविचल वास ।।**
**अष्टमपद विशति पदे, सप्तम नवपद ज्ञान ।**
**तीर्थंकर पदवी लहे, आराधक भगवान ।।**

आरती के बाद निम्नलिखित अष्टदोहे बोले ।

**।। अष्टदोहे ।।**

**अंगुष्ठे अमृत वसे लब्धितणा भंडार ।**
**जय गुरू गौतम समरिये, वांछित फल दातार ।।१।।**
**प्रभू वचने त्रिपदी लही, सूत्र रचे तेणीवार ।**
**चऊदह पूरब माँ रचे, लोकालोक विचार ।।२।।**
**भगवति सूत्र कर नमी, बंभी लिपी जयकार ।**
**लोकलोकोत्तर सुख भणी, वाणी लिपी अढार ।।३।।**
**वीर प्रभू सुखिया थया, दिवाली दिन सार ।**
**अंतर महूरत तत्क्षणे, सुखिया सहू संसार ।।४।।**

केवलज्ञान लहे सदा, श्री गौतम गणधार ।
सुरनर पर्षदा आगले घट अभिषेक उदार ।।५।।
सुरवर पर्षदा आगले, भाखे श्री श्रुतनाण ।
नाण थकी जग जाणिये, द्रव्यादिक चौठाण ।।६।।
ते श्रुतज्ञान ने पुजिये, दीप धूप मनोहार ।
वीर आगम अविचल रहो, वर्ष एकवीस हजार ।।७।।
गुरू गौतम अष्टक कही, आणि हर्ष उल्लास ।
भाव भरी जे समरशे, पुरे सरस्वती आस ।।८।।

### ।। लोगस्स (चउव्वीसत्थव) का पाठ ।।

लोगस्स उज्जोयगरे, धम्मतित्थयरे जिणे ।
अरिहंते कित्तइस्सं, चउवीसं पि केवली ।।१।।
उसभमजियं च वंदे, संभवमभिणंदणं च सुमइं च।
पउमप्पहं सुपासं, जिणं च चंदप्पहं वंदे ।।२।।
सुविहिं च पुप्फदंतं, सीयल सिज्जंच वासुपुज्जं च।
विमलमणंतं च जिणं, धम्मं संतिं च वंदामि ।।३।।
कुंथुं अरं च मल्लिं, वंदे मुणिसुव्वयं नमिजिणं चं।
वंदामि रिट्ठनेमि, पासं तह वध्दमाणं च ।।४।।
एवं मए अभित्थुआ, विहुयरयमला पहीणजरमरणा।
चउवीसंपि जिणवरा. तित्थयरा में पसीयंतु ।।५।।
कित्तियवंदिय महिया, जे ए लोगस्स उत्तमा सिद्धा।
आरुग्गबोहिलाभं, समाहिवरमुत्तमं दिंतु ।।६।।
चंदेसु निम्मलयरा, आइच्चेसु अहियं पयासयरा।
सागरवरगंभीरा, सिद्धा सिद्धिं मम दिसंतु ।।७।।

### ।। नमोत्थुणं का पाठ ।। (२ बार)

नमोत्थुणं अरिहंताणं, भगवंताणं, आइगराणं, तित्थयराणं, संय-संबुध्दाणं, परिसुत्तमाणं पुरिस-सीहाणं, पुरिस-वर-पुण्डरीयाणं, पुरिसवरगंध-हत्थीण, लोगुत्तमाणं, लोगनाहाणं, लोगहियाणं, लोगपईवाणं, लोगपज्जोयगराणं, अभयदयाणं, चक्खुदयाणं, मग्गदयाणं, सरणदयाणं, जीवदयाणं, बोहिदयाणं, धम्मदयाणं, धम्मदेसियाणं, धम्मणायगाणं धम्मसारहीणं धम्मवरचाउरंत-चक्कवट्टीणं दीवोत्ताणं, सरणगइपइट्ठाणं, अप्पडिहय वरनाण दंसणधराणं, विअट्टछउमाणं, जिणाणं जावयाणं, तिन्नाणं तारयाणं, बुद्धाणं बोहयाणं, मुत्ताणं मोयगाणं, सव्वन्नूणं, सव्वदरिसीणं, सिव-मयल-मरुअ-मणंत-मक्खय-मव्वाबाह-मपुणरावित्ति-सिद्धिगइ-नामधेयं ठाणं संपत्ताणं नमो जिणाणं जियभयाणं।

(दूसरे में - ठाणं संपाविउकामाणं णमो जिणाणं जियभयाणं)

(तिसरे में) णमोत्थुणं मम धम्मायरियस्स धम्मोवदेसयस्स अणेगगुण संजुत्तस्स जाव संपविउ कामस्स ।

### ।। मंगलपाठ ।।

चत्तारि मंगलं, अरिहंता मंगलं, सिद्धा मंगलं, साहू मंगलं, केवलिपण्णत्तो धम्मो मंगलं । चत्तारि लोगुत्तमा, अरिहंता लोगुत्तमा, सिद्धा लोगुत्तमा, साहु लोगुत्तमा, केवलिपण्णत्तो धम्मो लोगुत्तमो । चत्तारि सरणं पव्वज्जामि, अरिहंते-सरणं पव्वज्जामि, सिद्धे-सरणं पव्वज्जामि, साहू-सरणं पव्वज्जामि, केवलिपण्णत्तधम्मं सरणं पव्वज्जामि। अरिहंतो का शरणा, सिद्धों का शरणा, साधुओं का शरणा, केवलिप्ररुपित दयाधर्म का शरणा। चार शरणा, दुर्गति हरणा और शरणा नहीं कोय, जो भवी प्राणी आदरे तो अक्षय अमरपद होय ।

अंगुष्ठे अमृत वसे, लब्धि तणा भंडार ।
श्रीगुरु गौतम सुमरिये, मनवांछित फलदातार।
भावे भावना भाविये, भावे दीजे दान ।
भावे धर्म आराधिये, भावे केवलज्ञान ।
पावे पद निर्वाण ।।

यहाँ दीपावली विधि संपन्न होती है । ●

---

दीपावली का यह दिन भगवान महावीर का निर्वाण दिन है अत: भगवान के फोटो के सामने बैठकर तन-मन को एकाग्र कर, रात्री में निम्न जप की २०-२० मालाएँ जपें ।

**ॐ ऱ्हीं श्री महावीर स्वामी सर्वज्ञाय नम:**

बादमें

**ॐ ऱ्हीं श्री महावीर स्वामी पारंगताय नम:**

की मालाएँ गिनें अथवा यथाशक्ति जाप करें।

कार्तिक सूद प्रतिपदा की सूर्योदय से पूर्व स्नानादि के बाद नमस्कार महामंत्र का जप करें और

**ॐ ऱ्हीं श्री गौतमस्वामी केवलज्ञानाय नम:**

२० माला फेरें ।

फिर यह प्रार्थना बोले...

**कुंदिंदुगोखीर तुसार वन्ना**
**सरोज हत्था कमले निसन्ना**
**वाएसिरी पुत्थय वग्ग हत्था**
**सुहायसा अम्ह सया पसथ्था**

इस प्रार्थना के बाद विद्या संपदा का महान ओजस्वी मंत्र का अवश्य जप करें (२० माला)

**ॐ ऱ्हीं ॐ**

जैन मंदिर या स्थानक में जाकर संतों का प्रभु का दर्शन करें । मांगलिक श्रवण करें । गौतम स्वामी को मध्यरात्री के बाद भली सुबह केवलज्ञान प्राप्त हुआ अत: उस समय 'गौतम रास' अवश्य गावें ।

दीपावली की इस विधि का यथायोग्य पालन करें। सबका भला हो मंगल हो - कल्याण हो । ●

## सन २०२० चे दीपावली पूजनाचे मुहूर्त

❖ **पुष्प नक्षत्र : निज आश्विन (मारवाडी मिती कार्तिक) वद्द ७**

**शनिवार दि. ७-११-२०२० :** सकाळी ८.०० ते ९.३० शुभ, दुपारी १२.३० ते २.०० चल, २.०० ते ३.३० लाभ, ३.३० ते ५.०० अमृत, सायंकाळी ६.३० ते ८.०० लाभ, रात्री ९.३० ते ११.०० शुभ, ११.०० ते १२.३० अमृत

❖ **धनत्रयोदशी : (धनतेरस) निज आश्विन (मारवाडी मिती कार्तिक) वद्द १३**

**शुक्रवार दि. १३-११-२०२० :** सकाळी ६.३० ते ८.०० चल, ८.०० ते ९.३० लाभ, ९.३० ते ११.०० अमृत, दुपारी १२.३० ते २.०० शुभ, सायंकाळी ५.०० ते ६.०० चल

❖ **महालक्ष्मी पूजन (दीपावली वही पूजन) : निज आश्विन (मारवाडी मिती कार्तिक) वद्द ३०**

**शनिवार दि. १४-११-२०२० :** दुपारी २.३० ते ३.३० लाभ, ३.३० ते ५.०० अमृत, सायंकाळी ६.३० ते ८.०० लाभ, रात्री ९.३० ते ११.०० शुभ, ११.०० ते १२.३० अमृत, १२.३० ते २.०० चल, पहाटे ५.०० ते ६.३० लाभ

वृषभ लग्न कुंभ नवमांश सायंकाळी ६.१० ते ६.२४, वृषभ लग्न वृषभ नवमांश सायंकाळी ६.४९ ते ७.०२
वृषभ लग्न सिंह नवमांश सायंकाळी ७.२७ ते ७.४०

❖ **नूतन वर्ष : वीर संवत २५४७, विक्रम संवत २०७७, कार्तिक शु।। १**

**सोमवार दि. १६-११-२०२० :** सकाळी ६.३० ते ७.१५ (७.१५ नंतर बीजचा क्षय आहे)

**श्री शुभम् भवतु !**

**प्रेषक : नवीनकुमार बी. शहा** - २३० पाटील प्लाझा, मित्र मंडळ चौक, पुणे ९. मो. ९८२२०९०३३९
**पं. भवरलाल, पुरूषोत्तम दायमा** १३०६ रविवार पेठ, पुणे-२. फोन २४४७४८३५, मो. ९२७३७५१३४६

## कव्हर तपशील - ऑक्टोबर २०२०




❖ **गुरु आनंद तीर्थ – चिचोंडी**

आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या जन्म गावी चिचोंडीत गुरु आनंद तीर्थ हे एक भव्य तीर्थ साकारण्यात येत आहे. या तीर्थाच्या निर्मितीची संपूर्ण माहिती या अंकात (पान नं. १५ ते २२) वर दिलेली आहे.

❖ **आचार्य श्री शिवमुनिजी म.सा. – पुरस्कार**

श्रमण संघीय आचार्य सम्राट डॉ. शिवमुनिजी म.सा. यांना डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम – विश्व शांती पुरस्कार २०२० ने सन्मानित केले गेले. १८ सप्टेंबर रोजी सूरत येथे आचार्यश्रींच्या ७९ व्या जन्म महोत्सव दिवशी हा पुरस्कार देण्यात आला. (बातमी पान ७९)

❖ **पर्युषण स्थापना व घर सजावट स्पर्धा, पुणे**

पुणे महावीर प्रतिष्ठान येथे गौतमलब्धी प्रेरक उपाध्याय प.पु. श्री प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या मंगलमय सान्निध्यात पर्युषण पर्व मध्ये गौतमलब्धी फाउंडेशन तर्फे घर सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली. पर्युषण पर्वच्या प्रतिक चिन्हाची स्थापना घरोघरी करण्याची संकल्पना त्या निमित्ताने राबविण्यात आली. यावेळी पारितोषिक वितरण करताना जैन जागृतिच्या संपादिका सौ. सुनंदा चोरडिया, सौ. चंचलबाई कोठारी, सौ. मधुबाला कटारिया, सौ. राजश्री पारख, श्री. विजयजी भंडारी, श्री. कांतीलालजी ओसवाल इ. मान्यवर.

❖ **लक्ष्य, पुणे – खेल प्रोत्साहन पुरस्कार**

पुणे, क्रीडा क्षेत्रातील गुणवत्ता शोधून त्यांच्या विकासासाठी लक्षपूर्वक कार्य करणाऱ्या पुण्यातील 'लक्ष्य' या संस्थेचा २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनी खेल प्रोत्साहन पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

नवी दिल्ली येथून आभासी पध्दतीने होणाऱ्या पुरस्कार सोहाळ्यात राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते 'लक्ष्य' संस्थेचे अध्यक्ष श्री. विशालजी राजकुमारजी चोरडिया यांचा सन्मान करण्यात आला. (बातमी पान नं. ९१)

❖ **श्री. मोहनलालजी संचेती – उद्योगरत्न पुरस्कार**

पुणे थेरगाव येथील उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते श्री. मोहनलालजी कन्हैयालालजी संचेती यांना खासदार श्रीरंग (आप्पा) बारणे सोशल फौंडेशनच्या वतीने 'उद्योग रत्न' हा पुरस्कार खासदार श्री. संभाजी राजे भोसले यांच्या हस्ते देण्यात आला. (बातमी पान नं. ९३)

❖ **श्री. नवीनभाई शहा, पुणे**

पुणे – सुप्रसिध्द ज्योतिर्विद व अनेक सामाजिक संस्थाचे संस्थापक मा. नवीनकुमार बालचंद शहा यांचा अमृत महोत्सव नुकताच साजरा करण्यात आला. या निमित्त ज्योतिष परिषदचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्री. पाटणकर यांच्या हस्ते मानपत्र, शाल देऊन सन्मान करण्यात आला. (बातमी पानं नं. ८५)

❖ **वर्धमान एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट, पुणे**

वर्धमान एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट, वर्धमान प्रतिष्ठान, पुणे येथे बी.ए., एम.ए., पीएच.डी., डीग्री प्रोग्राम इन प्राकृत ॲण्ड जैन स्टडीज हे कोर्स सुरु झाले आहेत. संस्थेच्या अध्यक्षा सौ. मधुबाला चोरडिया, सचिव श्री. विलासजी राठोड, सौ. अर्चना लुणावत या प्रसंगी उपस्थित होते. ●